सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०१८–१९/४०९ दि. २७/०८/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशि संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग

विषय : भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक सामाईक प्रवेश परीक्षा–२०१८
संदर्भ : मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे जा.क्र. ससं/उशि/पुवि/प्रि.आय.ए.एस.
ट्रेनिंग नोटीस/२०१८/२३४१, दिनांक १५.०९.२०१८ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा व तत्सम स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याने त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी श्री. अरूण बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेवून राज्यात नाशिक व अमरावती येथे आय.ए.एस. व तत्सम परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०१९ ची तयारी करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे विनामूल्य पूर्वप्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यासाठी रविवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१८ रोजी नाशिक केंद्रावर सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली असून सदर परीक्षेत सहभागी पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहिरात महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या सूचनाफलकावर प्रसिद्ध करणेबाबत निर्देशित केले आहे. याबाबतचे माहिती पत्र सोबत जोडले आहे.

भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक सामाईक प्रवेश परीक्षेबाबतची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून ही माहिती सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ प्रि.आय.ए.एस.ट्रेनिंग नोटीस/२०१८/ 234 दिनांक १५.९.२०१८

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७.
२. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६
३. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.
४. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
६. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित /कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे/अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

**विषय : विद्यापीठ/महाविद्यालयाच्या सूचना फलकावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ : शासन निर्णय, आयएएस-२००९/प्र.क्र.३५/०९/मशि-२, दिनांक १७ जुन, २०१३.

उपरोक्त संदर्भाधिन विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा व तत्सम स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याने त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी श्री. अरुण बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेवून राज्यात नाशिक व अमरावती येथे आय.ए.एस. व तत्सम परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०१९ ची तयारी करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे विनामूल्य पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यासाठी रविवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१८ रोजी नाशिक केंद्रावर सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली असून सदरील परीक्षेत सहभागी पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. (सोबत जाहिरात जोडलेली आहे.)

सदर जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. व्ही. पी. नारखेडे)
सहसंचालक, (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

# महाराष्ट्र शासन

# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

## (PRE I.A.S. TRAINING CENTRE, NASHIK)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२ २२२.

दुरध्वनी क्रमांक : ०२५३-२२३०१०० वेबसाईट : www.iasnashik.org.in ई-मेल : iasnasik@gmail.com


## प्रवेश परीक्षा-२०१८

### UPSC नागरी सेवा परीक्षा २०१९ (IAS/IFS/IPS etc.) च्या परीक्षापूर्व प्रशिक्षण-२०१८-१९

केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षा-२०१९ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे प्रवेशासाठी **रविवार, दिनांक-११.११.२०१८** रोजी प्रवेश परीक्षा फक्त नाशिक केंद्रावर घेतली जाणार आहे.

१. **प्रवेश क्षमता : एकुण ७० पैकी-**
   (१) भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक - ६०
   (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे BARTI व्दारा अनुदानीत - १०

२. **प्रवेश परीक्षा पध्दत :** प्रवेश परीक्षा एकुण-२०० गुणांची असेल, UPSC नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहिल.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकुण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| **Section-I**<br>सामान्य अध्ययन | ५० | १०० | **English** | सकाळी<br>११.०० ते ०१.००<br>वाजेपर्यंत<br>एकुण-०२ तास | वस्तुनिष्ठ<br>Objective type (MCQ)<br>Negative marking<br>one-third (0.33)<br>of the marks assigned to that question |
| **Section-II (C-SAT)**<br>सामान्य अध्ययन | ४० | १०० | **English** | | |
| सामान्य अध्ययन **Section-II (C-SAT)** हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे. | | | | | |

३. **पात्रतेच्या अटी :**

३.१ उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य.१०९८/(१७१/९८)/म.शि.-१ दिनांक २४.०४.२००० नुसार प्रवेश पात्रता.

३.२ **शैक्षणिक अर्हता :**

३.२.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उतीर्ण (कोणत्याही शाखेची पदवी) किंवा प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षेचे गुणपत्रक आवश्यक आहे.

३.३ **वयोमर्यादा : वय-२१ ते ३२ वर्षे-** खुला संवर्ग, **वय २१ ते ३५ वर्षे-** इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./ भ.ज., **वय-२१ ते ३७ वर्षे-**अनुसूचित जाती व जमाती (सदर वयोमर्यादा युपीएससी प्रमाणे असून दिनांक **०१ ऑगस्ट, २०१९** रोजी उमेदवाराचे वय कमी किंवा जास्त नसावे)

३.४ भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या केंद्रामध्ये पूर्व/मुख्य परीक्षाकरिता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

३.५ केंद्राच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमास सहभाग घेता येणार नाही.

३.६ वैद्यकीय पदवी धारकांनी Intership पूर्ण करणे आवश्यक आहे.

४. **अर्ज करण्याची पध्दत :**

४.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४.२ ऑनलाईन अर्ज www.iasnashik.org.in या संकेतस्थळाव्दारे दिनांक ०१.०९.२०१८ ते ०३.१०.२०१८ या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

५. **प्रवेश अर्ज शुल्क :** (ऑनलाईन पेमेंट किंवा चलनाव्दारे)

५.१ खुला संवर्ग- रु. ३००/- ५.२ इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज./अनुसूचित जाती/जमाती- रु. १५०/-

५.३ ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगव्दारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल किंवा

५.४ चलनाव्दारे शुल्क जमा करण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित चलनाव्दारे शुल्क अर्ज सादर केल्याच्या दोन दिवसानंतर परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. कालावधी दिनांक ०४.०९.२०१८ ते ०६.१०.२०१८ पर्यंत आहे.

६ **प्रवेश परीक्षा संबंधी :**

६.१ प्रवेश परीक्षा अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक ०३.१०.२०१८ असून त्यानंतर वेबलिंक बंद होईल.

६.२ प्रस्तुत परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास दिनांक २६.१०.२०१८ ते ११.११.२०१८ पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.३ परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती, सूचना प्रशिक्षण केंद्राच्या www.iasnashik.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नाशिक
दिनांक : २८.०८.२०१८.

स्वाक्षरी/-
(डॉ. विजय पां. नारखेडे)
संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.